**शपथेवर सरतपास श्री. ए. एम. चनकापुरे अधिवक्ता गैरअर्जदारा तर्फे :—**

०४. शपथपत्र नि.क्र. सी—२१ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. कागदपत्र यादी नि. सी—१८ बी सोबत अनु. क्र. ०१ वरील उपदान रक्कम अदा करणे बाबतचे पत्र मला दाखविले सदर पत्र मी प्रमाणीत केलेले आहे. सदर पत्र हे बॅकेच्या रेकॉर्ड प्रमाणे खरे व बरोबर आहे सदर पत्रात **नि. सी—२४** देण्यात आली. कागदपत्र यादी नि. सी—१८ बी सोबत अनु. क्र. ०२ वरील शिल्लक रजेचा पगार अदा करणे बाबतचे पत्र मला दाखविले त्यावर प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सही आहे ती मी ओळखतो सदर अर्ज मी प्रमाणित केलेला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बॅकेतील रेकॉर्ड प्रमाणे खरा व बरोबर आहे त्यास **नि. सी—२५** देण्यात आले. कागदपत्र यादी नि. सी—१८ बी सोबत अनु. क्र.०३, ०४ वरील संचालक मंडळ सभा दि. रोजीचे प्रोसेडिंग बुक ची प्रमाणित प्रत मला दाखविली सदर प्रोसेडिंग बुक मधिल मजकुर हा रेकॉर्ड प्रमाणे खरा व बरोबर आहे त्यास **नि. सी—२६ व सी—२७** देण्यात आले. कागदपत्र यादी नि. सी—१८ बी सोबत अनु. क्र. ०५ वरील गैरअर्जदार बॅकेची सेवा नियमावली मला दाखविली सदर सेवानियमावली मी प्रमाणित केलेली आहे. सदर नियमावली ला **नि. सी—२८** देण्यात आले. कागदपत्र यादी नि. सी—२३ सोबत सादर केलेले प्रमाणपत्र मला दाखविले त्यावर माझी सही आहे त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. प्रमाणपत्राला **नि. सी—२९** देण्यात आली. कागदपत्र यादी नि. सी—१८ बी सोबत अनु. क्र. ०६ व ०७ वरील अर्जदार याचे बॅक खात्याचा खाते उतारे मला दाखविले त्यावर मी प्रमाणीत केल्याची सही आहे. त्यातील मजकूर हा रेकॉर्ड प्रमाणे खरा व बरोबर आहे. सदर बॅक उता—याला **नि. सी—३० व सी—३१** देण्यात आली.

पुढील सरतपास पुर्ण.

**शपथेवर उलटतपास श्री. खेळकर वा. म. अधिवक्ता अर्जदारा तर्फे :—**

०५. नि. ३१ वरील दि. २७/१०/२०२० रोजीची रक्कम रू. १६,८१,८४६/— अर्जदाराच्या खात्यात वर्ग केल्याची नोंद मला दाखविली. सदर नोंद ही अर्जदाराला उपदान, पिएफ व शिल्लक रजा याचे दिलेल्या पगाराबाबत आहे. सदर एकुण रक्कमेमध्ये उपदान, पिएफ व शिललक रजा या संदर्भात प्रत्येकी किती रक्कम अर्जदाराला देण्यात आली हे मला सांगता येणार नाही. त्या संदर्भात बॅकेच्या पत्रामध्ये उललेख केलेला आहे. नि. सी—२४ वरील बॅकेचे पत्र मला दाखविले त्यामध्ये उपदान निधी ची रक्कम ही १६,८१,८४६ रू. दर्शविली आहे. हे म्हणने खरे आहे की सदर रक्कमेमध्ये पिएफ व शिल्लक रजेच्या रक्कमेचा उललेख केलेला नाही.

०६. हे म्हणने खरे नाही की नि. ३१ वरील रक्कम रू. १६,८१,८४६ ही उपदान, पिएफ व शिल्लक रजा याचे पगाराबाबतील असल्याचे मी खोटे सांगत आहे. नि. ३० वरील दि. १०/०९/२०२०

रोजीची रक्कम रू. ३,७१,६८८/— अर्जदाराच्या बॅंक खात्यात क्रेडिट झाल्याची नोंद मला दाखविली. हे म्हणने खरे आहे की सदर नोंद ही शिललक रजेचे रोखीकरणाबाबत आहे.

०७. नि. यु—१३ वरील बॅंकेने अर्जदार यास दिलेले पत्र मला दाखविले हे म्हणने खरे आहे की सदर पत्राप्रमाणे याच्या हक्काच्या रजा २१३ शिल्लक असल्याबाबतचे नमुद आहे, अर्जदाराच्या २०८ अर्धपगारी रजा म्हणजेच १०४ दिवस रजा अर्जदाराच्या खात्यावर शिल्लक दाखविल्या आहेत. तसेच अर्जदाराच्या आजारी रजा १४० शिल्लक दर्शविल्या आहेत. हे म्हणने खरे आहे की नि. सी—२५ प्रमाणे अर्जदार यास केवळ १५३ दिवसाच्या हक्काच्या रजेचे रोखीकरण रक्कम रू. ३,७१,६८८ अर्जदाराला दिलेले आहे. हे म्हणने खरे आहे की अर्जदार यास हक्काच्या २१३ रजेचे पुर्ण रोखीकरण दिलेले नाही. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराच्या हक्काच्या सर्व रजेचे रोखीकरण करून त्याची रक्कम अर्जदाराला देणे गरजेचे आहे.

**मध्यान्हामुळे उलटतपास तहकुब करण्यात आला.**

**मध्यान्हानंतर शपथेवर उलटतपास सुरू.**

०८. नि. यु—१८ मला दाखविले हे म्हणने खरे आहे की सदर पत्र हे वैद्यकीय रजा न उपभोगता काम करणे बाबत अर्जदार यास दिलेले पत्र आहे. हे म्हणने खरे आहे की सदर पत्रानुसार अर्जदाराने बॅंकेत वैद्यकीय रजा न घेता काम केले आहे. अर्जदार हा दि. ३०/०६/२०२० रोजी रिटायर होणार होता. हे मला माहिती नाही की

अर्जदाराने रजा न उपभोगता सलग ०८ महिने काम केलेले आहे. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराने बॅकेला रजा न घेता काम केलेले असल्याने त्याचा मोबदला देण्यात यावा अशी मागणी केली होती. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराच्या मागणी प्रमाणे त्याला रजेच्या कालावधीतील केलेल्या कामाचा पगार दिलेला नाही. हे म्हणने खरे नाही की अर्जदार हा बॅकेकडून रक्कम रू. ६,६२,१२८/— मिळण्यास पात्र आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०८.०९.२०२५.